पिंपरी चिंचवड महानगरपालिका
लेखा विभाग,
क्र.लेखा/१/कावि/ 3402 /२०१९
दिनांक :- 29/03/२०१९

विषय :- दि. ३०/३/२०१९ अखेरची महसुली/भांडवली बिले अदायगीबाबत...

संदर्भ :- परिपत्रक क्र. लेखा/१/कावि/१८३/२०१९ दि. १२/२/२०१९

परिपत्रक,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आर्थिक वर्ष ३१ मार्च २०१९ रोजी संपत आहे. सन २०१८-१९ चे सुधारीत अंदाजपत्रकानुसार उपलब्ध तरतुदीचा योग्य प्रकारे विनियोग होणेसाठी मा.आयुक्त यांचेकडील संदर्भिय परिपत्रकान्वये चालू आर्थिक वर्षाची सर्व महसुली/भांडवली बिले दि. २५/३/२०१९ पर्यंत लेखा विभागाकडे सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. तथापि बिलांची संख्या तसेच पिंपरी चिंचवड कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशन यांचे दि. १८/३/२०१९ पत्रानुसार बीले घेण्याची मुदत ३१ मार्च पर्यंत वाढविणेबाबत विनंती केलेली आहे.

तरी सदरची बाब विचारात घेता दि. ३१/३/२०१९ रोजी कार्यालयास साप्ताहिक सुट्टी असल्याने व दि. २९ व ३०/०३/२०१९ रोजी लेखा विभागाकडे प्राप्त झालेली बिले तपासणीसाठी अवधी प्राप्त होणेच्या दृष्टीने सदरची बिले घेण्याची मुदत दि. २८/०३/२०१९ पर्यंत वाढविणेत येत आहे. सर्व विभागांनी त्यांचेकडील सर्व प्रकारची बिले दि. २८/३/२०१९ अखेर लेखा शाखेकडे न चुकता सादर करावीत. या दिनांकानंतर येणारी बिले स्विकारण्यात येणार नाहीत. याची नोंद घेणेत यावी.

मुख्य लेखा अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८

प्रति,

सर्व संबंधित विभागप्रमुख